विजयसिंह मोहिते पाटील परिचर्या महाविद्यालय
ॲन्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूट, अकलूज,
ता.माळशिरस,जि.सोलापूर

---

**परिचर्या पदव्युत्तर (एम.एस्सी. नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक.एनयुआर १४२१/प्र.क्र.५२/२१/शिक्षण-२
**वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,**
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१
**दिनांक:- ३० मार्च,२०२१**

**वाचा:-** १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. एनयुआर/विजयसिंह मोहिते पाटील परिचर्या महाविद्यालय /सोलापूर/तपासणी अहवाल/ई/खाजगी/४८२१/२०२१, दिनांक २३/०२/२०२१

२) शासन पत्र क्रमांक.एमईडी १०२०/प्र.क्र.०२/२०/शिक्षण-२, दिनांक ०३/०२/२०२०

३) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/पीजी/ १६३२/२०१९, दिनांक २३/१२/२०१९

**प्रस्तावना** :- विजयसिंह मोहिते पाटील परिचर्या महाविद्यालय ॲन्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूट , अकलूज, ता.माळशिरस,जि.सोलापूर या महाविद्यालयात कम्युनिटी हेल्थ नर्सिंग आणि चाईल्ड हेल्थ नर्सिंग हे अभ्यासक्रम प्रत्येकी ०५ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावाची शिफारस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २३/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे . सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सक्षमता तपासणी करुन उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २३/०२/२०२१ अन्वये अहवाल शासनास सादर केला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची शिफारस तसेच संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन , मुंबई यांनी शासनास सादर केलेला सक्षमता तपासणी अहवाल विचारात घेऊन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-** विजयसिंह मोहिते पाटील परिचर्या महाविद्यालय ॲन्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूट , अकलूज, ता.माळशिरस,जि.सोलापूर या महाविद्यालयात एम.एस्सी ( कम्युनिटी हेल्थ नर्सिंग) आणि एम.एस्सी ( चाईल्ड हेल्थ नर्सिंग) हे अभ्यासक्रम प्रत्येकी ०५ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे मान्यता देण्यात येत आहे:-

**अटी व शर्ती:-**

१) सदरहू महाविद्यालयातील कम्युनिटी हेल्थ नर्सिंग आणि चाईल्ड हेल्थ नर्सिंग या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता प्रत्येकी ०५ इतकीच राहिल.

२) राज्य शासन/केंद्र शासन /मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

(कृ.मा.प)